ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT

Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २८ पुणें, बुधवार तारीख ३ जानेवारी, १९६२ अंक १

## विविध माहिती

**कटांगाच्या अध्यक्षांचें उत्पन्न**—कांगोमधून फुटून बाहेर पडू इच्छिणाऱ्या कटांगा प्रांताचे मि. शोंबे ह्यांना प्रांतांतील तांब्याच्या खाणीच्या कंपनीकडून दरसाल ५·२ कोटी डॉलर्स उत्पन्न मिळतें. त्यांना भरावे लागणारे कर आणि त्यांच्या मालकीचा कंपनीमधील भांडवलावरील नफा ह्यांच्या रूपानें वरील उत्पन्न त्यांना मिळतें. ह्या तांब्याच्या खाणींतील भांडवलापैकी १४·४७ टक्के भांडवल ब्रिटिश मालकीचें आहे.

**अमेरिका भारताची साखर घेणार**—१९६२ सालाच्या पहिल्या सहा महिन्यांत ५०,००० टन साखर अमेरिकेला निर्यात करण्याची परवानगी अमेरिकन सरकारनें दिली आहे. साखर निर्यात करण्यासाठी तीन बोटींची व्यवस्था करण्यांत आली आहे. जानेवारी महिन्याच्या मध्यापर्यंत ५० हजार टनांपैकी ३१,५०० टन साखर अमेरिकेची वाट चालू लागेल. बाकीची साखर पाठविण्यासाठी बोटी मिळविण्याची खटपट जारीनें चालू आहे.

**पूर्व जर्मनीची मंद प्रगति**—आर्थिक विस्ताराच्या बाबतींत पूर्व जर्मनी पूर्व युरोपमधील इतर देशांच्या मानानें मागासलेला आहे. ह्याचें कारण तेथें मनुष्यबळाचा तुटवडा आहे. पूर्व युरोपमधील देशांतून औद्योगिक उत्पादनांत ९ पासून १७ टक्क्यांपर्यंत वाढ झालेली आहे, तर पूर्व जर्मनींत ही वाढ ५॥ टक्केच झाली आहे. १९४९ ते १९६० पर्यंत ३,३०,००० लोकांनीं पूर्व जर्मनींत आसरा घेतला.

**मद्रास येथें धातु-संशोधन संस्था**—नॅशनल मेटॅलर्जिकल लॅबोरेटरी ह्या संघटनेतर्फे लोखंडाव्यतिरिक्त इतर धातुविषयक संशोधन करणारी एक संस्था स्थापन करण्याचा विचार चालू आहे. नवीन संस्था कोठें स्थापन करावयाची तें अद्याप ठरलेलें नाहीं. परंतु कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्चचे संचालक प्रा. एम्. एस. थॅकर ह्यांनीं असें सुचविलें आहे कीं, संस्थेसाठी मद्रास शहर सर्व दृष्टींनीं सोयीचें आहे.

**परदेशीयांच्या मालकीच्या जमिनीचें राष्ट्रीयीकरण**—संयुक्त अरब प्रजासत्ताकमधील परदेशीय नागरिकांच्या मालकीच्या जमिनीचें राष्ट्रीयीकरण करण्यांत येईल, असें अध्यक्ष नासर ह्यांनीं जाहीर केलें आहे. १९५६ मध्यें ब्रिटिश व फ्रेंच फौजांनीं सुएझ कालव्याच्या विभागांतून माघार घेतल्यावर ब्रिटिश व फ्रेंच मालकीच्या जमिनींचें राष्ट्रीयीकरण करण्यांत आलें होतें. तथापि अजून इटालिअन, ग्रीक, इत्यादि नागरिकांच्या मालकीची बरीच जमीन आहे.

**तांत्रिक दर्जा वाढविण्याची जरुरी**—हिंदुस्थान एअरक्रॅफ्ट लि. ह्या कारखान्याचा २१ वा वर्षदिन साजरा करण्यांत आला. ह्या प्रसंगीं बोलतांना कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर एअर व्हाइस मार्शल रंजन दत्त म्हणाले कीं भारताची संरक्षणव्यवस्था मजबूत करण्यासाठी विमानासारख्या संरक्षकविषयक कारखान्यांतील कामाचा तांत्रिक दर्जा उंचावण्यांत आला पाहिजे.

**अहमदाबाद येथील गौळवाडा**—अहमदाबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या मालकीच्या गौळवाड्याचें उद्घाटन भारताचे अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई यांनीं केलें. गौळवाड्याच्या स्थापनेसाठीं ८५ लाख रुपये खर्च आला, व त्या कामीं संयुक्त राष्ट्रसंघटनेतर्फे मदत मिळाली. अहमदाबाद शहराला आतां शुद्ध दुधाचा पुरवठा करतां येईल.

**वृत्तपत्रांना लागणारा कागद**—इंडिअन अँड ईस्टर्न न्यूजपेपर सोसायटीचे अध्यक्ष श्री. नायर ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक प्रतिनिधीमंडळ युरोपच्या दौऱ्यावर गेलें होतें. प्रतिनिधीमंडळानें रशिआ, फिनलंड, स्वीडन व डेन्मार्क ह्या देशांना भेटी देऊन वृत्तपत्रांना लागणारा कागद आयात करण्याच्या शक्यतेविषयीं पाहणी केली. त्यांच्या प्रयत्नांना कांहीं प्रमाणांत यश आल्याचें समजतें. सध्यां भारताला दरसाल १,२५,००० टन कागद लागतो.

**दक्षिण व्हिएटनाममधील कायदा**—दक्षिण व्हिएटनामच्या कायदेमंडळानें एक कायदा मंजूर करून खाजगीरीत्या नृत्यगृहें अगर सौंदर्य-स्पर्धा चालविण्यास बंदी केली आहे. कायद्याचा भंग करणाऱ्यांना दंडाची व कैदेची शिक्षा देण्याची व्यवस्था कायद्यांत करण्यांत आली आहे. उत्तान नृत्यें व धंदेवाईक नृत्यांगना ह्यांनाहि बंदी करण्यांत आली आहे.

**दंतवैद्यकाचा फिरता दवाखाना**—झेकोस्लोव्हाकिआच्या सरकारकडून भारताच्या अध्यक्षांना दंतवैद्यकाचा मोटारीवर बसविलेला दवाखाना भेटीदाखल देण्यांत आला आहे. ह्या दवाखान्यांत दंतविषयक शस्त्रक्रियेची अद्यावत हत्यारें व क्ष किरणाच्या साह्यानें फोटो काढण्याची व्यवस्था आहे. वीजनिर्मितीची स्वतंत्र सोयहि त्यांत आहे.

**आग्नेय आशिआचा विकास**—जपानचे मुख्यमंत्री मि. इकेडा ह्यांनीं कराचींत असें सांगितलें कीं पाकिस्तानच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला जास्तींत जास्त मदत करण्याची जपानची इच्छा आहे. आग्नेय आशिआंतील औद्योगिक विकास साधूं पाहणाऱ्या राष्ट्रांची उन्नति झाली तरच जपानची भरभराट होणें शक्य आहे, ह्याची जपानला जाणीव आहे.

**घाना राज्याला मदत**—आफ्रिके[illegible] देशांतील एक मोठें धरण बांधण्यासाठी अमेरिके[illegible] देऊं केलें आहे. हें धरण बांधण्यासाठी ३२·४ कोटी डॉलर्स खर्च येणार आहे. धरण पूर्ण झाल्यावर घानांतील जलविद्युतशक्तीचें उत्पादन एकदम २० पटीनें वाढणार आहे. ह्या विजेच्या साह्यानें पुढील ३० वर्षांत १०० कोटी डॉलर्स किंमतीचें अल्युमिनियम निर्माण करणें घानाला शक्य होईल.

**मद्रास जवळील कारखाना**—आवडी येथें, लष्कराला लागणाऱ्या अवजड वाहनांचें व यंत्रसाहित्यांचें उत्पादन करणारा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखाना काढण्यास मध्यवर्ती सरकारनें नुकतीच संमति दिली आहे. तो स्थापन करण्याच्या कामीं ब्रिटनमधील व्हिकर्स-आर्मस्ट्रॉंग कंपनीचें सहकार्य घेण्यांत आलें आहे. आवडी येथील लष्करी तळ गेल्या महायुद्धाच्या वेळीं उभारण्यांत आलेला आहे.

**पोळ्या करण्याचें यंत्र**—जीवनलाल गज्जर नांवाच्या गृहस्थांनीं पोळ्या करण्याचें यंत्र शोधून काढलें आहे. हें यंत्र विजेवर चालणारें असून त्याच्या साह्यानें मळलेल्या कणिकेच्या गोळ्यापासून दर मिनिटास जास्तींत जास्त १५० पोळ्या होतील असा त्यांचा दावा आहे. लाटून तयार झालेल्या पोळ्या भाजण्यासाठी ते आणखी एक यंत्र तयार करीत आहेत.

**कॅनडाची देणगी**—कॅन्सरच्या रोगावर उपचार करण्याचें साधन म्हणून अलीकडे कोबाल्ट बाँबचें महत्त्व वाढलेलें आहे. कॅनडानें कोलंबो योजनेप्रमाणें अशा प्रकारचा एक बाँब भारताला देणगी म्हणून दिला आहे. कोबाल्ट बाँबच्या साह्यानें कॅन्सरवर उपचार करण्याचें तंत्र अगदीं अलीकडचें आहे.

**गौळवाडा कामगारांना शिक्षण**—गौळवाडा चालविण्याचें शिक्षण घेण्यासाठी पुढील ४ वर्षांत बरेच परदेशीय कामगार भारतांत येणार आहेत. १९६० च्या ऑक्टोबर महिन्यापासून शिक्षण देणारे तीन अभ्यासक्रम चालविण्यांत आले. त्याचा फायदा ६३ परदेशीय विद्यार्थ्यांनीं घेतला. डेन्मार्क व भारत ह्यांच्या सहकार्यानें शिक्षणाची योजना आखण्यांत आली आहे.

**अहमदाबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशन**—अहमदाबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या १९६२–६३ च्या अंदाजपत्रकांत कोणतेहि नवे कर बसविण्यांत आलेले नाहींत अगर जुन्या करांत वाढहि करण्यांत आलेली नाहीं. गुजरात राज्यसरकारनें शहरांतील स्थावर मालमत्तेवरील कर सोडून दिल्यामुळें हें शक्य झालें, अशी माहिती अहमदाबादच्या म्युनिसिपल कमिशनरनीं दिली आहे.

**हरिजनांसाठी वसाहत**—सिंदखेडा ह्या ठिकाणीं हरिजनांसाठी एक वसाहत स्थापन करण्याचें महाराष्ट्र सरकारनें ठरविलें आहे. हरिजनांची राहाण्याची सोय करण्यासाठी ती स्थापन करण्यांत येत असून ह्या कामासाठी १८,७५० रुपये मंजूर करण्यांत येत आहेत. सिंदखेडा हें गांव छत्रपती शिवाजी महाराजांची आई राजमाता जिजाबाई ह्यांचें जन्मस्थान आहे.

**इटलीचें औद्योगिक मंडळ**—इटालीचें एक व्यापारी मंडळ इटलीच्या परदेशीय व्यापारखात्याच्या मंत्र्यांच्या नेतृत्वाखालीं भारतांत आलें आहे. इटली व भारत ह्यांच्या व्यापारांत भारताची आयात निर्यातीपेक्षां अधिक आहे. भारताची निर्यात वाढविण्याच्या दृष्टीनें मंडळानें भारताच्या अर्थखात्याशीं वाटाघाटी केल्या. त्याचप्रमाणें इटलीनें दिलेल्या १० कोटी डॉलर्सच्या कर्जाचा विनियोग कसा करावा, ह्याविषयींहि चर्चा करण्यांत आली.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

रजिस्टर्ड ऑफिस : ११७७, बुधवार पेठ, पुणें शहर

—: भांडवल :—

(३०-११-१९६१)

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल ... | ... | रु. ३९,००,००० चे वर |
| गंगाजळी व इतर निधि | ... | रु. १७,१०,००० |
| खेळतें भांडवल | ... | रु. १९ कोटींचे वर |

★ महाराष्ट्र, आंध्र, म्हैसूर आणि मध्यप्रांतांत मिळून बँकेच्या ७९ शाखा

★ सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

★ स्टर्लिंग व डॉलर करन्सीमधील प्रवासी चेक्स विकत मिळतात

★ परदेशी लेटर्स ऑफ क्रेडिट उघडली जातात

— १९ जून, १९६१ पासून सुरू झालेल्या ५ नव्या शाखा —

सावंतवाडी, मालवण, कुडाळ, बांदा व फोंडा

—१ जुलै, १९६१ पासून सुरू झालेल्या ९ नव्या शाखा—

लक्ष्मीरोड, पुणें २, कँप, पुणें १, लोणावळा, खोपोली, बारामती, ओझर (ताम्हट), सरदार पटेल रोड (मुंबई), परळ (मुंबई) व चिंचवड

चिं. वि. जोग, जनरल मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. ३ जानेवारी, १९६२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारतामधील चहाच्या उत्पादनाचें महत्त्व

आसाम राज्यसरकारनें शिलाँग येथें चहा परिषद भरविली होती. भारतांत अशा प्रकारची ही पहिलीच परिषद होती. परिषदेचें उद्घाटन मध्यवर्ती सरकारचे अर्थमंत्री श्री. मुरारजी देसाई ह्यांनीं केलें. उद्घाटनप्रसंगीं बोलतांना श्री. देसाई म्हणाले, कीं भारताच्या अर्थव्यवस्थेंत चहाला एक विशेष स्थान आहे. देशाचें औद्योगीकरण घडवून आणण्यासाठी भारताला भांडवली माल आणि औद्योगिक कच्चा माल ह्यांची जरूर आहे. औद्योगिक-दृष्ट्या प्रगत असलेल्या देशांना चहाची निर्यात करून भारत आपल्याला लागणारा वरील माल आणूं शकतो. त्यामुळें निर्यात व्यापारांत चहाचें महत्त्व विशेष आहे. आसाम राज्यांत भारतामध्यें सर्वांत अधिक चहा पिकविण्यांत येतो. म्हणून ह्या राज्यांत चहा परिषद भरविण्यांत यावी हें योगच आहे. सध्यां उत्पादन करण्यांत येतो त्यापेक्षाहि अधिक चहा उत्पादन करणें अगत्याचें आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत चहाच्या उत्पादनाचें उद्दिष्ट असें ठरविण्यांत आलेलें नव्हतें. चहाच्या धंद्याच्या मामुली विकासास अनुसरून कार्यक्रमाच्या अखेरीस ७० कोटी पौंड चहाचें उत्पादन होईल अशी अपेक्षा होती. १९५८ सालीं हें उत्पादन गांठण्यांत आलें. चहाचें उत्पादन हळुहळू वाढत होतें. परंतु १९६० मध्यें चहा पिकविणाऱ्या ईशान्य भागांत अवर्षण घडलें व त्यामुळें चहाच्या उत्पादनांत घट झाली. १९६१ च्या ऑक्टोबरपर्यंतच्या कालाचा विचार केला तर ह्याच कालाच्या मागील वर्षांतील उत्पादनापेक्षा उत्पादन ६·३ कोटी पौंडांनीं वाढलेलें दिसून येतें. उत्पादन वाढण्याची सध्यांची प्रवृत्ति लक्षांत घेतली तर १९६१ मध्यें चहाचें उत्पादन ७६ कोटी पौंडांचा उच्चांक गाठेल असा रंग दिसतो·

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या सालांतील यंदाचें उत्पादन व विकास ह्यांचा विचार करण्यासाठी नेमण्यांत आलेल्या मंडळानें ह्यासंबंधीं कांहीं शिफारसी केल्या आहेत. मंडळाच्या मतानें कार्यक्रमाच्या अखेरीस ९० कोटी पौंड चहाचें उत्पादन करण्यांत यावें आणि ६१ कोटी पौंड चहाची निर्यात करण्यांत यावी, असें आहे. १९५९ सालच्या मानानें १९६० सालीं चहाची निर्यात बरीच कमी झाली. तथापि १९६१ सालीं निर्यात समाधानकारक झालेली दिसते. परदेशीय चलनाच्या टंचाईमुळें चहाच्या मळ्यांना जितकें खत द्यावयास पाहिजे तितकें देतां आलें नाहीं. १९५८-५९ सालापासून चहाच्या मळ्यांना लागणाऱ्या खतांत बरीच कपात करण्यांत आलेली आहे. पण चहाचा धंदा हा परदेशीय चलन मिळविण्याच्या कामांत महत्त्वपूर्ण असल्यानें आणि तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस उत्पादन ९० कोटी पौंड होईल अशी अपेक्षा असल्यानें भारत सरकारनें धंद्याची मागणी पूर्ण करण्याचें कबूल केलें आहे. चहाच्या मळ्यांना दर एकरीं जितकें नत्रयुक्त खत लागतें तितकें देण्याचा सरकारचा विचार आहे. चहाच्या धंद्याला प्रामुख्यानें सल्फेट ऑफ अमोनिआ हें खत लागतें. ईशान्य भारतामधील चहाच्या मळ्यांना हें खत पुरविण्याच्या कामीं बरीच सुधारणा झाली आहे. तथापि ह्या खताची १९६१–६२ मध्यें सर्वच्या सर्व मागणी पुरविणें शक्य झालेलें नाहीं. ही मागणी पुरी करण्याच्या प्रयत्नांत सरकार कसूर करणार नाहीं. चहाच्या धंद्याचा विकास हा भारताच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनें तर महत्त्वाचा आहेच, पण आसामच्या विशिष्ट अर्थव्यवस्थेंत ह्या धंद्याच्या भरभराटीला खास महत्त्व आहे ह्याची सरकारला जाणीव आहे.

---

## अभ्रकाच्या निर्यातीसाठी बाजारपेठ पाहिजे

अभ्रक निर्यात वाढ-मंडळाच्या वार्षिक सभेंत भाषण करतांना बिहारचे मुख्यमंत्री श्री. विनोदानंद झा म्हणाले कीं अभ्रकाच्या परदेशीय बाजारपेठेंतील परिस्थिति बदलत चाललेली आहे. ह्या बदलत्या परिस्थितीचा विचार करून भारत सरकारनें व अभ्रकाच्या धंद्यांत गुंतलेल्या लोकांनीं योग्य ते उपाय योजून परदेशीय बाजारपेठांचा विकास केला पाहिजे. भारताच्या अभ्रकाचें मोठें गिऱ्हाईक म्हणजे अमेरिका. अमेरिकेला निर्यात करण्यांत येणाऱ्या अभ्रकापैकीं बराच मोठा हिस्सा भारत व अमेरिका ह्यांच्यामधील ऐनजिनसी विनिमयाच्या कराराप्रमाणें निर्यात करण्यांत येतो. आतां हा करार संपलेला आहे. अभ्रकाचा साठा करून ठेवण्यासाठीहि अमेरिका बरेंच अभ्रक भारतापासून खरेदी करीत असते. परंतु ह्या संबंधीच्या कराराची मुदतहि आतां संपलेली आहे. त्यामुळें भारताच्या अभ्रकाच्या निर्यातींत घट झालेली आहे. अलीकडे लष्करी कारणासाठी अमेरिका ब्राझीलपासून अधिक अभ्रक घेऊं लागली आहे; इतकेंच नव्हे तर ब्राझिलमधील अभ्रकाच्या खाणींचा विकास करण्याच्या कामींहि लक्ष घालूं लागली आहे. तथापि, रशिआ, पोलंड, झेकोस्लोव्हाकिआ, जपान व ऑस्ट्रेलिआ ह्या देशांना निर्यात करण्यांत येणाऱ्या अभ्रकांत समाधानकारक वाढ झालेली आहे. गेल्या पन्नास वर्षांत फक्त भारतांतच अभ्रकाचें उत्पादन प्रामुख्यानें होत आहे. परंतु उत्पादित होणाऱ्या अभ्रकाच्या दर्जाकडे फारसें लक्ष देण्यांत आलेलें नाहीं. आतां इंडिअन स्टँडर्डस् इन्स्टिट्यूशन ह्या बाबीकडे लक्ष देणार आहे. ह्या संस्थेनें ठरविलेला अभ्रकाचा दर्जा इतर देश मान्य करतील अशी अपेक्षा आहे.

---

## पलाई सेंट्रल बँकेचें रुपयाचें ४० न. पैसे डिव्हिडंड

पलाई सेंट्रल बँकेच्या ठेवीदारांना रुपयांतले ४० न. पैसे डिव्हिडंड ऑफिशिअल लिक्विडेटरनें जाहीर केलें आहे. १६ जानेवारी, १९६२ ते १६ जुलै, १९६२ ह्या मुदतींत त्याची रक्कम लिक्विडेटरच्या कचेरींत मिळूं शकेल. ज्यांना डिव्हिडंड मिळावयाचें आहे, अशांना नोटीस पाठविण्यांत आली आहे. ती दाखल केल्याविना डिव्हिडंड दिलें जाणार नाहीं.

---

## व्यापारी वर्गाचें समाजांतील मानाचें स्थान

**( श्री. लालचंद हिराचंद ह्यांचें सोलापूर जिल्हा व्यापारी परिषदेंत अध्यक्षीय भाषण )**

व्यापारी हा समाजजीवनांतील एक आवश्यक घटक आहे. समाजाच्या हरघडीच्या गरजा पुरविणें, जरुरीच्या वस्तू मिळतील तेथून किमान भावानें आणून जेथें आवश्यक तेथें पोहोंचविणें, हें एक महत्त्वाचें, समाजसेवेचें कार्य तो सतत करीत असतो. व्यापारी वर्गाबद्दल मला आदर आहे. कारण तो एक कर्तव्यदक्ष, धडाडीचा व प्रयत्नशील घटक आहे. आज हें आपलें कार्य तो मोठ्या शिताफीनें, चिकाटीनें व यशस्वी रीतीनें करीत आला आहे. देशाच्या कानाकोपऱ्यांत, दूरच्या ग्रामीण विभागांत, पहाडांत, जंगलांत, वाळवंटांत, सर्वत्र हें समाजसेवेचें कार्य तो करीत असतो. हें करीत असतांना त्याबद्दल तो मेहेनताना घेतो, मोबदला घेतो, नफा घेतो. नफा घेणें हें त्याच्या श्रमाचें बीजच आहे. नफा न घेतां धंदा – किफायतशीर धंदा— तो कसा करणार ? शरीराला आपले व्यवहार करावयाला ज्याप्रमाणें रक्त आवश्यक आहे त्याप्रमाणें उद्योगधंदा यशस्वी रीतीनें चालविण्यास नफा आवश्यक व इष्ट आहे. नफ्याशिवाय त्यानें व्यवहार कां व कशाकरितां करावा ? तो कांहीं धर्मादाय पेढी उघडीत नाहीं. धंदा करावा, त्यांत बरकत मिळवावी व ती पुन्हा धंद्यांत घालावी या महत्त्वाकांक्षेनें तो धंद्यांत कष्ट घेतो, श्रमतो व आपल्या श्रमानें, बुद्धिचातुर्यानें व आपल्या अंगच्या कौशल्यानें पैसे कमावितो. समाजांत मानाचें व आदराचें स्थान पटकावतो. नागरिक जीवनांत त्याचें कार्य ओळखलें जातें व जनता त्याला मानमान्यतेनें वागविते. समाजांत त्याला प्रतिष्ठा प्राप्त होते. कोणत्याहि स्थानिक विधायक घडामोडींत तो सक्रिय भाग घेतो व आपला वांटा उचलतो. अनेक कार्यांत— मग तें सामाजिक असो, सांस्कृतिक असो, धार्मिक असो, वा शैक्षणिक असो, राजकीय वा आरोग्यविषयक असो—त्याचा संबंध त्या गोष्टींशीं येतो व धंद्यांत तो जरी पैसा मिळवीत असला तरी त्याचा सदुपयोग अशा नानाविध सार्वजनिक कार्यांत होत असतो.

परंतु असें असूनहि बुद्धिपुरस्सर, जाणूनबुजून, व्यापारी समाजाविषयीं अपप्रचार केला जातो. समाजांत व्यापाऱ्यांविषयीं गैरसमज पसरविले जातात. छोटी गोष्ट अनेक मुखांतून सांगितली म्हणजे हळूहळू विश्वास बसत जातो व तिरस्कारबुद्धि निर्माण होते. आपण आपल्या परीनें आपल्या वागणुकीनें, वर्तनानें, आचारानें व प्रचारानें हा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेंच, व्यापारी नीति ही राजकीय कौटिल्यनीति नव्हे तर प्रामाणिक नीति आहे हें आपल्या व्यवहारानें सिद्ध केलें पाहिजे व त्याची अंमलबजावणी प्रत्यक्ष व्यवहारांत केली पाहिजे. आपल्या श्रमांबद्दल परिमित नफा घेऊन चोख व्यवहार जर आपण केला तर समाजांत आज आपली जी हेटाळणी होत आहे ती परिस्थिति पालटून जाईल व आपला समाजहिताचा, समाजसेवेचा मानबिंदु वाढेल. तागडीचा झोक धर्माच्या काट्याकडे झुकेल व चोख व्यवहाराचा दाखला म्हणून आपल्याकडे समाज धन्यतेनें पाहील. समाजांतील हें मानाचें स्थान व्यापारीवर्गानें पुन्हा मिळविलें पाहिजे. हें स्वप्न प्रत्यक्षांत आणण्याकरितां आपण प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. मला खात्री आहे कीं, व्यापारीसमाजानें योग्य मेहेनताना जर घेतला तर समाज सहस्र हस्तानें भरपाई करतो व व्यापारी उलाढाल वाढून अंतिम दृष्ट्या त्याचाच फायदा होतो. स्वार्थ व परमार्थ दोन्ही गोष्टी त्याला साधतां येतात.

---

## शोषणमुक्तीसाठी व्याजनिरसन

**“ सहकारी पतपेढ्या, म्हणजे परस्पर शोषक मंडळ्या ”**

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धी खात्यातर्फे प्रकाशित होणाऱ्या “ सर्वोदय ” ह्या मासिकाच्या नोव्हेंबर, १९६१ च्या अंकीं, आप्पासाहेब पटवर्धन – जीवन व कार्य हा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यामध्यें पू. आप्पासाहेबांच्या ‘ शोषण मुक्ती ’ ची माहिती देण्यांत आली आहे. आप्पासाहेब हल्लीं व्याजनिरसनाचा विचार लोकांसमोर मांडीत आहेत. व्याज घेणें अनुचित आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. आप्पासाहेबांच्या विचारांकडे आम्हीं वाचकांचें मुद्दाम लक्ष वेधूं इच्छितों. पैसे देणाराला व्याजाची पैहि घेण्याचा नैतिक अधिकार तर नाहींच पण कायदेशीर अधिकार नसावा; उलट, ऋणकोला मुद्दलांत कांहीं सूट मिळणें उचित आहे, असें ते म्हणतात. एकाच्या ठेवी घेऊन दुसऱ्याला त्या वापरण्यासाठी देणाऱ्या बँकांना हे विचार कितपत व्यवहार्य वाटतील, ह्याची चौकशीहि करण्याचें कारण नाहीं !

शोषण-मुक्ति म्हणजे काय ? आप्पासाहेब अलीकडे व्याजनिरसनाचा विचार लोकांसमोर मांडीत आहेत. व्याज घेणें अनुचित आहे असें त्यांचें म्हणणें आहे. ते म्हणतात,

“धनकोच्या लोभी सावकारीवर सामाजिक नीतिनियमांची तसेंच सरकारी कायद्याचींहि अनेक बंधनें असावयास पाहिजेत.

सावकाराला फारतर सर्वच्यासर्व मुद्दल परत वसूल करण्याची मुभा असावी. पण व्याजाची पैहि घेण्याचा त्याला नैतिक अधिकार तर नाहींच पण कायदेशीर अधिकारहि नसावा. उलट ऋणकोला मुद्दलांत कांहीं सूट मिळणें उचित आहे.

सरकार नवनिर्मितीसाठी तगाई देते तीवर जबर व्याज आकारतें. हें सरकारचें धोरण मुळांत अनुचित आहे. तगाई कर्जावर व्याज घेणें याचा अर्थ नवनिर्मितीच्या प्रयत्नावर कर लादणें असा होतो. म्हणजे प्रयत्नशील इसमाला उत्तेजन देण्याऐवजीं त्याचा हिरमोड करणें आहे.

म्हणून लोभास्तव किंवा लाभास्तव सावकारी चालविली जाऊं नये; परोपकार बुद्धीनें चालविण्यांत यावी.

म्हणजेच व्याजबट्ट्याची सावकारी असूं नये, आंतबट्ट्याची असावी. व्याजबट्टा म्हणजे निव्वळ ऐतखाऊपणा आहे.

संपत्तीच्या संग्रहाला ' आमची हरकत नाहीं. कालक्रमानुसार सहजीं घटत जाणारा संग्रह चालेल, पण आपोआप फुगत जाणारा संग्रह नको. बचावशील संग्रह चालेल, पण वढाईखोर ( वाढाळू ) संग्रह नको. '

भांडवल म्हणजे पैसा नव्हे, तर भावी उपयोगासाठी सांठवून ठेवलेले श्रम किंवा त्या श्रमांनीं बनविलेलें साधन.

भाडें म्हणजे घसारा किंवा झीज. म्हणून तें रास्त. रोकड भांडवलाला झीज नसते. त्यामुळें ती ग्राहकानें भरून देण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं.

दुसऱ्याच्या अडचणीचा फायदा घेण्याची दुष्ट वृत्ति हेंच व्याजखोरीचें मूळ आहे.

सध्यांच्या सहकारी पतपेढ्या म्हणजे परस्पर शोषक मंडळ्याच आहेत.

आमचें म्हणणें असें कीं, परस्पर शोषणांतून अप्रत्यक्षपणे परस्पर पोषण साधण्याचा हा वृथा खटाटोप करण्यापेक्षा सरळ परस्परपोषक धोरण स्वीकारणें उचित होईल. ”

---

## कौटुंबिक हितगुज

लेखक—श्रीपाद वामन काळे

प्रकाशक—मुकुंद शंकर किर्लोस्कर, किर्लोस्कर प्रेस, स्वारगेट पुणें, २. किंमत ३ रुपये.

किर्लोस्कर मासिकांत 'कौटुंबिक हितगुज' या सदराखाली श्री. काळे, संपादक 'अर्थ', पुणें हे जी एक नाविन्यपूर्ण व मार्गदर्शक अशी लेखमाला गेलीं कांहीं वर्षे लिहीत आहेत त्यांतील निवडक २९ लेखांच्या संग्रहानें हें पुस्तक किर्लोस्कर प्रकाशन म्हणून प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. या पुस्तकावर जे एका ऐन उमेदींतल्या नव्या महाराष्ट्रीय दांपत्याचे त्यांच्या छोट्या चिरंजीवासमवेतचें उद्योन्मुख चित्र रेखाटलेलें आहे, तें मुखपृष्ठाची शोभा वाढविणारें असें आहे, तसेंच लेखकाच्या 'हितगुजा' वर स्वच्छ प्रकाश टाकणारेंहि आहे. म्हणून या चित्राच्या निवडीबद्दल आम्ही प्रथम लेखक व प्रकाशक यांचें अभिनंदन करतों.

अर्थशास्त्री हा सामान्यतः अतिशय हिशेबी आणि रुक्ष प्राणि असावा अशी समजूत रूढ झालेली आहे. परंतु प्रस्तुत पुस्तकाचे लेखक श्री. वा. काळे यांचें लालित्यपूर्ण शैलीनें नटलेलें 'हितगुज' वाचल्यावर असें कबूल करावें लागेल कीं, ती सर्वसाधारण समजूत चुकीची असली पाहिजे, किंवा श्री. काळे हे तरी त्या नियमाला अपवाद असले पाहिजेत.

१२० पानांच्या या पुस्तकांत जे २९ लेख लघुनिबंधासारखे लिहिलेले आहेत, त्यांतील हितोपदेशाचें सार त्याच्या मथळ्यांनीं बोलकें केलेलें आहे. फक्त क्रमांक तीनचाच मथळा तेवढा आम्हांस योग्य वाटत नाहीं. "फुकट मिळतें म्हणून विकलें जाऊं नका" हा वाक्यप्रयोग एकाहून अधिक दृष्टींनीं बरोबर वाटत नाहीं व कानालाहि कसासाच लागतो. त्याऐवजीं "फुकट मिळतें तें फार महाग पडतें" हा मथळा चांगला शोभून दिसला असता. मथळ्याबाबतची ही एक गोष्ट सोडल्यास हें पुस्तक विसाव्या शतकांतील सर्वच कुटुंबवत्सल नागरिकांना अतिशय उपयुक्त, व्यवहार्य आणि कल्याणकारक मार्गदर्शन करणारें आहे असें आमचें प्रांजळ मत आहे.

महाराष्ट्रांतील सुशिक्षित, मध्यमवर्गीय दांपत्यांच्या संसाराचे नाना प्रकारचे नमुने पाहून व त्यांच्या सुखदुःखांची कारणमीमांसा निःपक्षपाती त्रयस्थ हितचिंतकाच्या दृष्टीनें करून त्यावर यथोचित उपाययोजना कशी करावी हें श्री. काळे यांनीं या छोट्या पुस्तकांत उत्तम प्रकारें सांगितलें आहे. पण लेखकानें हितगुजाच्या भाषेत मोठ्या आपुलकीनें तरुण पतिपत्नी, त्यांचे आप्तेष्ट, मित्र व वडीलधारी माणसें या सर्वांनाच केलेलें मार्गदर्शन इतकें मौलिक व सर्वप्रांतीय सुशिक्षित/ कुटुंबांनाहि लागूं पडणारें आहे कीं हें पुस्तक लौकरच आपल्या राष्ट्रभाषेत भाषांतरित केलें जाईल व तें सर्वांच्या धन्यवादास पात्र होईल असा आम्हांस विश्वास वाटतो. श्री. काळे यांचीं अनेक पुस्तकें गुजराती व हिंदी भाषेत भाषांतरित झालेलीं आहेत. त्यांच्या आंतरप्रांतीय कीर्तींत या 'कौटुंबिक हितगुजा 'नें मोलाची भर पडेल, हें निश्चित.

—'गजांना', कोल्हापूर

### बेळगांव बँकेची माधवनगर शाखा

दि बेळगांव बँक लि. च्या माधवनगर शाखेचें उद्घाटन गुरुवार, दि. २१ डिसेंबर रोजीं झालें. त्यानिमित्त संध्याकाळीं ४ ते ६ पानसुपारी समारंभ झाला.

## पुणें सें. को. बँकेची २० वी (आंबेगांव) शाखा

आंबेगांव तालुक्यांतील आंबेगांव या गांवीं पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेची २० वी शाखा महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. चिं. द. दात्ये यांचे शुभहस्तें उघडण्यांत आली. या समारंभास आसपासचे खेड्यांतील सुमारें एक हजार शेतकरी उपस्थित होते. बँकेचे संचालक श्री. साबळे गुरुजी यांनीं अध्यक्षांचा परिचय करून अध्यक्ष श्री. काळे यांनीं प्रास्ताविक भाषणांत बँकेच्या प्रगतीची व व्यापक दृष्टिकोणासंबंधीं विवेचन केलें; तसेंच या भागांतील हिरडा गोळा करण्यासाठीं लौकरच सहकारी पद्धतीवर हिरडा कारखाना निघत असल्याची माहिती दिली.

श्री. दात्ये यांनीं औद्योगिक सहकारी सोसायट्यांना दीर्घ मुदतीचा पुरवठा राज्य सहकारी बँक करील असें आश्वासन देऊन या भागांत लौकर एक सहकारी पद्धतीची भात सडण्याची गिरणी काढण्यांत यावी अशी सूचना केली. आंबेगांव सुपरवायझिंग युनियनचे अध्यक्ष श्री. शेटे गुरुजी यांनीं आभार मानले.

### उमरेड (नागपूर) येथें महाराष्ट्रांतील पहिली कोळसा खाण

राष्ट्रीय कोळसा विकास कॉर्पोरेशननें महाराष्ट्र राज्यांतील उमरेड येथें एक व ओरिसा राज्यांतील तालचेरजवळ एक अशा दोन नवीन कोळसाखाणींचें खाणकाम सुरू करण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक खाणींतून प्रतिवर्षी १० लाख मेट्रिक टनांहून अधिक उत्पादन करण्यांत येईल.

उमरेड येथील ही योजना म्हणजे या कॉर्पोरेशनची महाराष्ट्र राज्यांतील पहिली कोळसा खाण आहे. ही संकल्पित खाणीची जागा उमरेड शहराच्या उत्तरेस २ किलोमीटर आणि नागपूरपासून ४६ किलोमीटर आहे. ही खाण संपूर्णपणें यंत्रसज्ज व ओपनकास्ट स्वरुपाची असेल. या ठिकाणीं एकूण सुमारें ७ कोटी मेट्रिक टन कोळशाचे सांठे असण्याचा अंदाज असून त्यांतून फक्त साडे तीन कोटी मेट्रिक टन कोळसा हातीं लागण्याची अपेक्षा आहे. ही खाण जवळजवळ ५० वर्षे कोळसा देईल.

या खाणींतील कोळसा पहिल्या प्रतीचा असण्याचा अंदाज असून तेथें १९६४ च्या उत्तरार्धात प्रत्यक्ष उत्पादनास सुरवात होऊन खाणीची निर्धारित उत्पादनशक्ति १९६५–६६ मध्यें गांठली जाईल.

या योजनेवरील खर्च ४,३८,८०,००० रुपयांपर्यंत जाण्याचा अंदाज असून खाणींतून संपूर्ण उत्पादन सुरू झाल्यावर ती प्रतिवर्षी सुमारें ३५ लाख रुपये नफा देईल असें वाटतें. या खाणीचा कोळसा अकोला व भुसावळ येथील बीजकेंद्रांत व रत्नागिरी जिल्ह्यांतील अशुद्ध लोखंडाच्या शुद्धीकरणासाठी वापरला जाईल.

### ५२,००० सालामधील माणूस

५२,००० सालामधील माणूस कसा असेल तें दाखविणारें एक व्यंगचित्र जपाननें तयार केलें. तें फ्रान्समध्यें अतिशय लोकप्रिय झालें आहे. ह्या व्यंगचित्रांतील माणसाला पाय नाहींत व त्याला एकच हात असून तो डोक्यावर आहे.

## राजस्थानच्या औद्योगिक प्रगतीचा वेग

राजस्थानची औद्योगिक प्रगति झपाट्यानें होत आहे. १९५६ सालीं दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला आरंभ करण्यांत आला त्या वेळीं करण्यांत आलेल्या अपेक्षेपेक्षा प्रगति चांगली होत आहे. राज्यांतील शेतीचें उत्पादन वाढलें आहे. भाक्रा आणि चंबळ योजनेपासून मिळणाऱ्या पाणीपुरवठ्याचा चांगल्या प्रकारें उपयोग करून घेण्यांत येत आहे. पंचवार्षिक कार्यक्रमाच्या द्वारां औद्योगिक उत्पादनालाहि जोराची चालना मिळाली आहे. १९६०–६१ सालीं औद्योगिक विकासाच्या कामावर २८ कोटी रुपये खर्च करण्यांत आले ह्यावरून ही गोष्ट उघड होते. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत राज्य सरकारनें १०० कोटी रुपये खर्च करण्याचें ठरविलें होतें. अर्थ-व्यवहाराचें लोकशाहीच्या मार्गानें विकेंद्रीकरण करण्यांत आलें. ह्या बाबतींत आलेला अनुभव चांगला आहे. राज्याची आर्थिक परिस्थिति हळूहळू सुधारत चालली आहे. ह्याचें एक गमक म्हणजे राज्य सरकारनें उभारलेल्या कर्जाचा भरणा. १९६०–६१ सालीं ५ कोटी रुपयांचें कर्ज सरकारतर्फे उभारण्यांत आलें. तें सर्व विक्रीला सुरुवात झाल्याबरोबर अल्प कालांतच भरणा झालें. उद्योगधंद्यांच्या क्षेत्रावर नजर टाकतां नोंदलेल्या कारखान्यांची संख्या वाढत चालल्याचें दिसून येतें. १९५९ सालीं अशा कारखान्यांची संख्या ८९६ होती. १९६० सालीं ती संख्या १०५४ झाली, व १९६१ सालीं ती आणखी वाढलेली दिसेल अशी अपेक्षा आहे. कापड, सिमेंट आणि साखर ह्यांचें राज्यांतील उत्पादन गेल्या वर्षाच्या मानानें अनुक्रमें २·१ टक्क्यांनीं ३·२ टक्क्यांनीं आणि ७·१ टक्क्यांनीं वाढलेलें आहे. १९६० च्या अखेरीस राज्यांतील कारखान्यांतून दररोज सरासरी ५६,५४५ कामगार रोजंदारी करीत होते.

## एरोडजवळ कागदाचा कारखाना

एरोडजवळ शेषशायी पेपर अँड बोर्ड्स लि. ह्या नांवाचा कागदाचा कारखाना काढण्यांत येत आहे. कारखान्याला अमेरिकन कारखान्याकडून तांत्रिक साह्य मिळत आहे. कारखान्यासाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीपैकीं ६० टक्के यंत्रसामग्री जागेवर आली आहे. १९६२ च्या सप्टेंबर महिन्यांत कारखान्यांत उत्पादनाला प्रारंभ होईल. कारखान्यांत वापरण्यांत येणारी २० टक्के यंत्रसामग्री भारतांतच तयार करण्यांत आली आहे. कागद तयार करण्यासाठी लागणारा लगदा बांबूपासून तयार करण्यांत येणार आहे. दरसाल २०,००० टन कागद निर्माण करण्याचा कारखान्याचा इरादा आहे. कारखान्याच्या उभारणीच्या कामांत भारत व मद्रास सरकारनें बरीच मदत केलेली आहे.

## भाक्रा येथील विद्युत्-केंद्राचें उद्घाटन

भाक्रा येथें बांधण्यांत आलेल्या प्रचंड विद्युत्-केंद्राचें उद्घाटन पं. नेहरू ह्यांच्या हस्तें झालें. हें केंद्र आशिआंतील सर्वांत मोठें असून त्याचा अनुक्रम जगांतील पहिल्या १० केंद्रांत लागेल. वीजनिर्मिती केंद्र सतलज नदीच्या डाव्या तीरावर बांधण्यांत आलें असून त्यासाठी २०·२२ कोटी रुपये खर्च आला आहे. प्रत्येकी ९०,००० किलोवॅट वीज निर्माण करणारे ५ जनरेटर्स केंद्रांत बसविण्यांत आले आहेत. इमारत सात मजली असून त्यांत ६०० टन पोलादाचा उपयोग करण्यांत आलेला आहे. केंद्राचें काम पूर्ण करण्यासाठी १२,००० कसबी व बिनकसबी कामगार आणि ४० पर्यवेक्षक रात्रंदिवस खपत होते.

टेलिफोन नं. २४८३.

**पुणें सेंट्रल**

**को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड,**

लक्ष्मी पथ, पुणें शहर.

**इकडे वेळींच लक्ष द्या............**

आकर्षक व्याजाच्या दरानें आपला पैसा सहकारी बँकेंत गुंतवून निश्चिंत रहा.

दिनांक १ एप्रिल, १९६१ पासून आमचे बँकेनें कायम व सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचे दरांत वाढ केली आहे.

| कायम ठेव | व्याजाचे नवीन दर |
|---|---|
| १ वर्ष ... ... | ४ टक्के |
| २ वर्षें ... ... | ४। टक्के |
| ३ वर्षें ... ... | ४॥ टक्के |
| सेव्हिंग्ज ठेव ... ... | १॥ टक्के |

या खेरीज शॉर्ट टर्म व कॉल डिपॉझिट्सवरील व्याजाचे दराबाबत चौकशी करणेसाठी कार्यकारी संचालक यांना बँकेचे वेळेंत समक्ष भेटा. संबंधी सर्व माहिती ते आनंदानें पुरवतील.

बा. ग. अळतेकर, बी. कॉम., कार्यकारी संचालक.

शि. म. काळे, एम्. एल्. ए. अध्यक्ष.

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा**

शेडयूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः–युवरबँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू :–०·५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक :–३ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष–४ टक्के, २ वर्षें–४·२५ टक्के, ३ वर्षें–४·५० टक्के, ४ वर्षें–४·७५ टक्के, ५ वर्षें–५ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युमिलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

**शाखा विस्तार**

शाखा–१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केट यार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| गंगाजळी | रु. | ४ ३०,००० |
| ठेवी | रु. | २,८७,११,०३० |
| खेळतें भांडवल | रु. | ३,१५ ००,००० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी. बी. ए., बी. कॉम्., जनरल मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल्. बी. चेअरमन.

## भांडवली फंड वाढविण्याचा बँकांना "सल्ला"
### रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, श्री. एच. व्ही. आर. अय्यंगार, ह्यांचें सर्व शेड्यूल्ड बँकांना परिपत्रक

उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांची वाढती गरज भागविण्यासाठी हिंदी बँकांच्या जिंदगीवर अधिकाधिक ताण पडत आहे. गेल्या दहा वर्षांत, बँकांकडील ठेवी दुपटीनें वाढल्या आणि त्यांनीं दिलेल्या कर्जांत त्याहिपेक्षा अधिक वाढ झाली. कर्जांचे ठेवींशीं प्रमाण आतां ७०% आहे; दहा वर्षांपूर्वी तें फक्त ४९% होतें.

ही वाढती जबाबदारी यशस्वी रीतीनें पेलण्यासाठी बँकांवरील ठेवीदारांचा विश्वास वृद्धिंगत होत जायला हवा. गेल्या दहा वर्षांत बँकांकडील ठेवी बऱ्याच वाढल्या, पण त्यांचें भागभांडवल आणि गंगाजळी ह्यांत विशेष वाढ झाली नाहीं. ज्या बँकांचे रिझर्व्ह फंड त्यांच्या वसूल भांडवलापेक्षा कमी आहेत, अशा बँकांवर सध्यांच्या कायद्याप्रमाणें नफ्याचा ठराविक भाग रिझर्व्ह फंडांत टाकण्याचें बंधन आहे, त्यांनीं तें बंधन पाळलें आणि त्या मानानें रिझर्व्ह फंड वाढले, एवढेंच. शेड्यूल्ड बँकांच्या ठेवींशीं वसूल भांडवल-अधिक रिझर्व्हचें म्हणजे भांडवली फंडाचें प्रमाण १९५० सालीं ९% होतें, तें आतां १९६० मध्यें ५% वर उतरलें आहे.

बँकांचें किमान भांडवल व रिझर्व्ह, त्याचप्रमाणें दरसाल वार्षिक नफ्यांतून रिझर्व्हमध्यें टाकावी लागणारी रक्कम, ह्या संबंधांतील बँकिंग कायद्यांतील तरतुदी किमान स्वरूपाच्या आहेत; तो कायदा केला त्या वेळेच्या परिस्थितीला त्या धरून आहेत. युद्धकाळांत कित्येक बँका स्थापन झाल्या, त्यांच्या कारभाराची पातळी आवश्यकतेच्या मानानें फार खाली होती; ती वर खेंचण्याचा त्या कायद्याचा उद्देश होता. आजच्या बदललेल्या परिस्थितींत, ही किमान पातळी वाढविणें जरुरीचें झालें आहे. ठेवींशीं वसूल भांडवल अधिक जाहीर रिझर्व्ह फंड ह्यांचें, म्हणजे भांडवली फंडांचें, प्रमाण ६% पडावें, असा भारतांतील बँकांनीं प्रयत्न करायला हवा.

शक्य त्यावेळीं बँकांनीं नवें भांडवल बाजारांत विक्रीस काढावें, आणि जाहीर केलेल्या नफ्याच्या २०% रक्कम भांडवली फंड ठेवींच्या ६% होईपर्यंत दरसाल रिझर्व्हमध्यें टाकीत जावें. जाहीर केलेल्या रिझर्व्हवर भर देतांना गुप्त रिझर्व्हसूचें महत्त्व कमी आहे, असें मात्र कुणी मानूं नये. बँकांच्या मजबुतीच्या धोरणांत गुप्त रिझर्व्हजना महत्त्वाचें स्थान निर्विवाद आहे. कित्येक बँकांचा जाहीर रिझर्व्ह फंड जरा कमी आहेत, म्हणून त्यांचें अग्रमहत्त्व मुद्दाम सांगावयाचें एवढेंच.

हे फंड वाढवीत गेल्यानें बँकांचा लौकिक प्रसार पावेल. जाहीर नफ्याच्या २०% रक्कम रिझर्व्ह फंडाकडे वर्ग केल्यामुळें कार्यक्षम बँकांना गुप्त रिझर्व्हमध्येंहि पुरेशी रक्कम टाकण्यास आणि भागदारांना चालू दरानें डिव्हिडंड देण्यास व नोकरांना बोनस वांटण्यास अडचण वाटूं नये. ह्या संबंधांत कायदा किंवा रिझर्व्ह बँकेचे हुकूम ह्यापेक्षा अनौपचारिक करार बरा, ह्या दृष्टीनें बँकांनीं खालील प्रथा पाळावयाच्या आहेत:—

( १ ) ज्या बँकांचे जाहीर रिझर्व्ह वसूल भांडवलाइतके किंवा जास्त असतील, ( बँकिंग कंपन्यांच्या कायद्याचीं ११ व १७ हीं कलमें कांहींहि म्हणोत ) त्या बँकांनीं नेहेमींच्या आणि आवश्यक त्या तरतुदी करून उरणाऱ्या आपल्या जाहीर नफ्याच्या किमान २०% रक्कम जाहीर रिझर्व्हमध्यें टाकावी. जाहीर रिझर्व्ह अधिक वसूल भांडवल ह्यांची रक्कम ठेवींच्या ६% होईपर्यंत हें करीत राहावें.

( २ ) ज्या बँकांचे जाहीर रिझर्व्ह वसूल भांडवलापेक्षा कमी असतील, अशा बँकांनीं नफ्याच्या २०% एवढी रक्कम रिझर्व्ह-मध्यें पूर्ववत टाकावी. रिझर्व्ह हे वसूल भांडवलाच्या इतके होई-पर्यंत आणि वसूल भांडवल अधिक जाहीर रिझर्व्ह ह्यांची रक्कम ठेवींच्या ६% होईपर्यंत हें करीत राहावें. कित्येक बँका कायद्यानें सांगितलेल्यापेक्षाहि, म्हणजे २०% पेक्षाहि, जास्त नफा रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करीत आहेत; त्यांनीं ती प्रथा चालूच ठेवावी.

कित्येक बँकांना दरसाल रिझर्व्ह फंडांत रक्कम टाकून भांडवली फंडांचें ६% चें प्रमाण गांठायला बरींच वर्षें लागतील, हें उघड आहे. म्हणून नवें भांडवल विकून भांडवल वाढविण्याचाहि प्रयत्न त्यांनीं करीत राहायला हवा. वसूल न झालेलें भांडवल शक्य तितक्या लवकर वसूल करण्यासाठी कॉल्स करणें, हा दुसरा मार्ग आहे. कांहीं बँकांनीं ह्यापूर्वीच बाजारांत नवें भांडवल विक्रीस आणलें आहे, त्यांचें अनुकरण केलें जाणें इष्ट आहे.

[ बँकांचें शेअर भांडवल वाढलें, म्हणजे तोच नफा जास्त भांडवलावर विभागला जाऊन डिव्हिडंडची वाढ थांबणें क्रमप्राप्त दिसतें. कार्यक्षम बँकांना डिव्हिडंड आणि बोनस कायम ठेवणें अवघड जाऊं नये, असें रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांनीं म्हटलें आहे. विकलेलें पण वसूल न केलेलें भांडवल बँकांना आतां त्वरेनें वसूल करावें लागेल. ]

---

## दि कॉसमॉस को. अर्बन बँक लि.
### निवडून आलेलीं नवीं अधिकारमंडळें

**सल्लागार मंडळ**—श्री. अ. कानगो ( अध्यक्ष ), द. ल. पारखी ( उपाध्यक्ष ), डॉ. न. का. घारपुरे, वा. रा. होनप, य. बा. देहाडराय.

**कार्यकारी मंडळ**—र. पां. भोंडे ( कार्याध्यक्ष ), गं. मो. भणगे ( उपकार्याध्यक्ष ), द. ग. देव, रा. द. भट, शं. वि. दिवाकर, ह. गो. महाजन, अ. द. मोघे, स. स. देशपांडे, मो. वि. कुलकर्णी, मो. ना. पाटसकर, ग. वि. गोखले.

**स्थानिक आय-व्यय निरीक्षक**—बा. कृ. गोडबोले, व. का. साठे.

---

### गोव्याचा मुक्तीचा परिणाम

अमेरिकेंतील टाइम कॉर्पोरेशननें ओरिसांत घड्याळांचा कारखाना काढण्याचा विचार चालविला होता; परंतु भारतानें गोव्याची मुक्ती लष्करी कारवाईनें केल्यामुळें कार्पोरेशननें आपला विचार रद्द केला आहे. कॉर्पोरेशनच्या अध्यक्षांनीं ओरिसाच्या मुख्य प्रधानांना पत्र पाठविलें असून त्यांत असें म्हटलें आहे, "भारताच्या गोव्या-वरील स्वारीमुळें त्यानें जगभर पसरलेले आपले लाखों मित्र गमावले आहेत. गोवा, दमण व दीव ह्यांच्या मुक्ततेसाठी लष्करी बळाचा उपयोग करणार नाहीं अशी ग्वाही भारतानें दिली होती. परंतु आपला शब्द मोडून भारतानें लष्करी कारवाई केली आहे. त्यामुळें भारतांत घड्याळांचा कारखाना काढण्याचा कॉर्पोरेशनचा मनोदय अस्ताला गेला आहे."

---

### कॅन्सर रोगावरील लस टोचण्याचा प्रयोग

स्वीडनमधील एका डॉक्टरनें कॅन्सरविरुद्ध वापरण्यासाठी एक लस तयार केली असून ती टोचण्याचा प्रयोग करण्यांत आला आहे. ६० ते ७० वर्षें वय असलेल्या १२० लोकांनीं लस टोचून घेण्याची तयारी दाखविली. त्यामुळें हा प्रयोग शक्य झाला. हे सर्व लोक पूर्ण निरोगी आहेत. ह्या प्रयोगाचा अभ्यास करून १९६२ अखेर संशोधक डॉक्टर आपले निष्कर्ष जाहीर करणार आहेत.

### जी. जी. दांडेकर मशिन वर्क्स, लि.

वरील कंपनीस ३० जून, १९६१ अखेर संपलेल्या वर्षी घसारा, डेव्हलपमेंट रिबेट, व्यवस्थापकांना वेतन, कामगार व नोकरवर्गास वेतन, इत्यादींसाठी तरतूद करून २,०६,३५५ रु. नफा झाला. इन्कमटॅक्स निधीस ९४,५०० रु., लाभांश ( डिव्हिडंड ) निधीस ८४,००० रु., सर्वसाधारण ( जनरल ) निधीस १५,००० रु. आणि ग्रॅच्युइटी निधीस १२,५०० रु. वर्ग करून ऑर्डिनरी शेअर्सवर १२½% प्राप्तीकर–पात्र डिव्हिडंडसाठी ८०,९०० रु. चा विनियोग करण्यांत आला. कंपनीनें १,००,००० रु. चे ५% चे रिडीमेबल क्यु. प्रेफरन्स शेअर्स ८ डिसेंबर, १९४८ नंतर सहा महिन्यांची नोटीस देऊन केव्हांहि परत करतां ( रिडीम्ड ) येत होते; त्याप्रमाणें ३१ डिसेंबर, १९६१ रोजीं ते परत करण्यांत आले; त्याचप्रमाणें प्रत्येकी १०० रु. चे १,००० ऑर्डिनरी शेअर्स नवीन निर्माण करण्यांत आले.

### वृद्धांना पेन्शन मिळण्याची सोय

भारतामधील कांहीं राज्य-सरकारांनीं वृद्ध व अनाथ नागरिकांना पेन्शन देण्याची योजना चालू केली आहे. केरळ राज्य हें अशा राज्यांपैकी एक आहे. ज्या नागरिकांचें वय ७० पेक्षा अधिक असेल व ज्यांना कोणाचा आधार नसेल अशा लोकांना दरमहा रु. १५ पेन्शन म्हणून देण्यांत येत असतें. ही रक्कम फारशी मोठी नाहीं. तथापि, आधुनिक शासनाच्या एका महत्त्वाच्या कर्तव्याची कबुली ह्या योजनेमुळें मिळत आहे; परंतु राज्यकारभाराच्या रगाडग्यांत बऱ्याच वृद्धांना ह्या योजनेचा फायदा घेतां येत नाहीं असें दिसतें. केरळ राज्यांतील १९,५४७ वृद्धांनीं पेन्शनकरतां अर्ज केलेले होते. त्यांपैकी अवघ्या २,४३८ वृद्धांचे अर्ज मान्य करण्यांत आलेले आहेत. ४२४ वृद्ध तर पेन्शन मिळण्यापूर्वींच परलोकवासी झाले. पेन्शन मिळण्याचें वय ७० ऐवजीं ६५ करावें अशी सूचना राज्याच्या विधान सभेंत करण्यांत आली आहे. ती मान्य झाल्यास पेन्शन मागणाऱ्या वृद्धांची संख्या बरीच वाढेल.

### 'युद्ध आणि शांतता' नवा चित्रपट

लिओ टॉलस्टॉय ह्यांच्या 'युद्ध आणि शांतता' ह्या सुप्रसिद्ध कादंबरीवर आधारित एक चित्रपट रशिआ काढणार आहे. कांहीं वर्षांपूर्वी अमेरिकेंतील चित्रपटनिर्मात्यांनीं ह्या कादंबरीवर आधारलेला चित्रपट काढला होता. पण तो रशिआला आवडला नाहीं. कादंबरींतील बराचसा भाग नेपोलिअनच्या रशिआवरील स्वारीच्या कथेनें व्यापलेला आहे. अर्थातच चित्रपटांत युध्दाचे मोठे देखावे असणे अपरिहार्य आहे. रशिआंतील अग्निबाण पथकाचा एक सेनापति युध्दविषयक देखावे घेण्याच्या कामीं तांत्रिक सहकार्य देणार आहे.

### ब्रिटनतर्फे चीनला तेलाचा पुरवठा

चीनला तेल पुरविण्यास अमेरिकेचा सक्त विरोध असतांनाहि ब्रिटन कम्युनिस्ट चीनला तेल पुरविण्यास तयार असल्याची वार्ता आहे. चीनच्या सरकारला ब्रिटिश एअरक्रॅफ्ट कॉर्पोरेशननें ६ व्हायकाऊंट जातीचीं प्रवासी विमानें विकत दिलीं आहेत. ह्या विमानांसाठी लागणारें रॉकेल, वंगणाचें तेल आणि जळणाचें तेलहि ब्रिटन पुरविणार आहे. ह्यासंबंधीच्या करारांचीं बोलणीं चालू आहेत.

### दारूबंदी चौकशी समितीच्या शिफारशी

ओरिसा राज्यांतील दारूबंदींसंबंधीं चौकशी करून शिफारशी करण्यासाठी एक कमिटी नेमण्यांत आली होती. कमिटीनें आपला अहवाल राज्यसरकारला सादर केला आहे. १९६२ च्या एप्रिल महिन्यापासून राज्यांतील कांहीं भागांत दारूबंदी करण्यास प्रारंभ करावा आणि १९६६ च्या एप्रिलपासून राज्यांत संपूर्ण दारूबंदी करावी, अशी शिफारस कमिटीनें केली आहे. दारूबंदीचा कार्यक्रम सर्व राज्यांत प्रामाणिकपणें अमलांत आणला गेला पाहिजे. तसें न झाल्यास ह्या उपक्रमापासून चांगल्या परिणामापेक्षा एकदम वाईट परिणामच अधिक होतील असा इषाराहि कमिटीनें दिला आहे. सरकारी नोकर आणि निवडणुकींत निवडून येणारे सार्वजनिक कार्यकर्ते ह्यांच्यावर दारूपासून अलिप्त राहण्याची सक्ति करण्यांत यावी अशीहि एक शिफारस करण्यांत आली आहे.

### रेल्वे एंजिनांत कोळसा घालणारें यंत्र

खरगपूर येथील रेल्वेच्या कारखान्यानें रेल्वे एंजिनाच्या भट्टींत कोळसा फेकणारें एक यंत्र तयार केलें आहे. ह्या यंत्रामुळें फायरमनचें काम बरेंच कमी होईल आणि एंजिनाची कार्यक्षमताहि बरीच वाढेल. यंत्राच्या वापरामुळें कोळशाचे लहान तुकडेहि आतां वाया जाणार नाहींत. त्यामुळें रेल्वेला लागणाऱ्या कोळशांत बरीच बचत होण्यासारखी आहे. प्रत्येक यंत्र तयार करण्यासाठी सुमारें ३०,००० रुपये खर्च येईल. एंजिनाला जळणासाठी लागणारा कोळसा पुष्कळदां अगदीं हलक्या दर्जाचा असतो त्यामुळें एंजिनें राहावीं तितकी कार्यक्षम राहात नाहींत. गेल्या कांहीं महिन्यांत एंजिनें बिघडण्याचें प्रमाण ५०० टक्क्यांनीं वाढलें आहे. नवीन यंत्र वापरल्यास ही अडचण दूर होण्याची शक्यता आहे.

### ब्रिटन हा पोर्तुगालचा जुना दोस्त

गेल्या महिन्यांत भारतानें गोवा, दीव व दमण लष्करी कारवाईनें आपल्या अमलाखालीं आणलें. त्या वेळीं पोर्तुगालनें ब्रिटनकडे मदत मागितली होती. सन १३७३ सालांत ब्रिटन व पोर्तुगाल ह्यांच्यांत एक तह झालेला आहे. ह्या तहांतील ३ ऱ्या कलमाप्रमाणें पोर्तुगालनें मदत मागितली होती. वरील कलमाप्रमाणें ब्रिटननें पोर्तुगालला आक्रमणाविरुद्ध लष्करी मदत देण्याचें कबूल केलेलें आहे. ह्या लष्करी मदतींत धनुष्यबाणांचा व गोफणगुंड्यांचा उपयोग करणाऱ्या सैनिकांचा अंतर्भाव केलेला आहे. १६६१ च्या तहानेंहि पोर्तुगालच्या वसाहतींचें परचक्रापासून रक्षण करण्याची जबाबदारी ब्रिटननें घेतलेली आहे.

### भारी वजनाच्या यंत्रसामग्रीचे कारखाने

भारी वजनाच्या यंत्रसामग्रीचे कारखाने काढण्याचें काम हेवी एंजिनिअरिंग कॉर्पोरेशनकडे सोंपविण्यांत आलें आहे. कॉर्पोरेशनतर्फे अशा प्रकारचे चार मोठे कारखाने काढण्यांत येणार आहेत. सर्व कारखान्यांना मिळून २०० कोटी रुपये भांडवल लागेल असा अंदाज कॉर्पोरेशननें केला आहे. हे कारखाने झेकोस्लोव्हाकिआ व रशिआ ह्यांच्या साह्यानें रांची व दुर्गापूर ह्या ठिकाणीं स्थापन करण्यांत येणार आहेत. कॉर्पोरेशनचा १९६०–६१ सालचा अहवाल लोकसभेपुढें ठेवण्यांत आला आहे.

## दि कोल्हापूर शुगर मिल्स लि., कोल्हापूर, चे चेअरमन शेठ रामनिवास रामनारायण रुया ह्यांचें २८ व्या वार्षिक सभेंतील भाषण

( शुक्रवार, २२ डिसेंबर, १९६१ )

"मिल्सची उत्पादनक्षमता लक्षांत घेतां, आपण ३० जून, १९६१ अखेर संपलेल्या वर्षी बराच अधिक ऊस गाळूं शकलों असतों आणि बरेंच अधिक उत्पादन करूं शकलों असतों; कारण, उसाचा पुरवठा भरपूर प्रमाणांत उपलब्ध होता. पण, यांत्रिक, विशेषतः सेंट्रिफ्यूगलच्या, बिघाडामुळें अडचण सोसावी लागली. एकूण २,५१,८५० मेट्रिक टन ऊस गाळून ३,१६,७७७ पोतीं साखर तयार करण्यांत आली. हें उत्पादन समाधानकारक असलें आणि महाराष्ट्रांतील साखरकारखान्यांच्या अग्रस्थानीं आपण असलों, तरी आपल्या यंत्रांच्या उत्पादनक्षमतेचा पूर्ण फायदा आपण घेऊं शकलों नाहीं, हेंहि खरेंच. सरासरी उतारा १२.५७% पडला. आपल्या लागवडीचें उत्पादन फॅक्टरी स्थापन झाल्यापासूनच उत्कृष्ट प्रतीचें असून, दर एकरीं ४६.९ टन ऊस निघाला.

"आपल्या इस्टेटीवर, त्याचप्रमाणें ऊस पुरविणाऱ्या शेतकऱ्यांसाठीं सुधारणेच्या बाबतींत, बरेच श्रम घेतले जात आहेत. आपलें ऊस सुधारणाखातें आतां उत्कृष्ट रीतीनें संघटित असून त्यावर लायक नोकरवर्गाची योजना केलेली आहे. मिल्सला ऊस पुरविणाऱ्या शेतकऱ्यांना कंपनीनें रोख आणि मालाच्या स्वरूपांत २० लाख रुपयांहून अधिक आर्थिक साह्य केलें आहे. भारतांतील साखरेच्या उद्योगाची खरी प्रगति उसाच्या उत्पादनक्षेत्रांतच करावी लागणार आहे; दर एकरीं जास्त टनेज पडणें आणि उसाचा दर्जा सुधारणें, म्हणजे दर एकरीं जास्त साखर मिळविणें साखर उद्योगाच्या प्रगतीस अत्यावश्यक आहे, असें अन्नमंत्र्यांनीं योग्य प्रकारें दिग्दर्शित केलें आहे.

### मिल्सचा विस्तार योग्य वेळीं केला

"कोल्हापूर जिल्ह्यांतील गुळाचा जास्त भाव ( येथील गुळाला कोल्हापूरचें 'सोनें' समजलें जातें आणि त्याप्रमाणें त्याला किंमतहि मिळते ), त्याचप्रमाणें पाणीपुरवठ्याच्या सोईमुळें उसाखालील क्षेत्र गेल्या कांहीं वर्षांत द्रुत गतीनें वाढत गेलें आहे. ही प्रवृत्ति लक्षांत घेऊन, आपल्या डायरेक्टरांनीं योग्य त्या अधिक टनेजसाठीं मिल्सचा विस्तार करण्याचें ठरविलें. अगदीं योग्य वेळीं हा निर्णय घेण्यांत आला, हें नमूद करण्यास मला आनंद होतो; त्यामुळें आपला उत्पादनाचा खर्च मर्यादेंत राखणें कंपनीला शक्य झालें आहे, एवढेंच नव्हे, तर गेल्या कांहीं वर्षांत गुळाचा भाव उतरला त्यावेळीं कितीतरी ऊसकऱ्यांना त्यामुळें आधार प्राप्त झाला. कंपनीचें ऊस सुधारण्याचें धोरण आणि उसाला मिळणारी निश्चित किंमत, ह्यामुळें अधिकाधिक ऊसकरी आपला ऊस कंपनीला देण्यासाठीं कंपनीशीं करार करूं इच्छित आहेत.

### डिस्टिलरीमुळें रासायनिक उद्योगांना वाव

"फॅक्टरी प्लँटच्या बरोबरच डिस्टिलरीची वाढ करण्याचें कामहि हातीं घेण्यांत आलें होतें. तें आतां समाधानकारक पुरें झालें असून दररोज ६,००० गॅलन उत्पादन करण्यास सज्ज आहे. महाराष्ट्र सरकारनें आपली नाशिक येथील डिस्टिलरी बंद केल्यापासून, अबसोल्यूट अल्कोहोल तयार करून तो केमिकल आणि फार्मास्युटिकल उद्योगांना, त्याचप्रमाणें शैक्षणिक प्रयोगशाळांना पुरविणारी महाराष्ट्रांतील आपलीच एकमेव डिस्टिलरी आहे. कोल्हापूर विभागाची मध्यवर्ती डिस्टिलरी म्हणून आपली डिस्टिलरी गणली जाते; शेजारच्या कारखान्यांतील वाया जाणाऱ्या मोलॅसेसला किंमत येण्यास आपल्या डिस्टिलरीच्या वाढीमुळें जरूर तो वाव उपलब्ध झाला आहे. ह्या डिस्टिलरींत २० लक्ष गॅलनचें उत्पादन होऊं शकेल. अल्कोहोल-आधारित रासायनिक उद्योग हातीं घेणें ह्या मोठ्या उत्पादनामुळें आपणांस आवश्यक झालें आहे.

"ॲसेटिक ॲसिड, ब्युटिल अल्कोहोल आणि ब्युटिल ॲसिटेट ह्यांच्या उत्पादनास कंपनीला पूर्वीच लायसेन्स मिळालेला आहे. स्वीडनमधील मेसर्स चेर्मदूर ह्या फर्मला यंत्रसामग्रीची ऑर्डर देण्यांत आली असून १९६२ च्या पूर्वार्धांत ती येथें येऊं लागेल. अल्कोहोल-आधारित रासायनिक उद्योगांचें जाळेंच आपल्या मिल्सच्या आधारानें निर्माण होईल, असें चित्र माझ्या चक्षूंपुढें उभें आहे. अर्थात्, आपल्या कंपनीनें आपली प्रगतीची सध्यांची गति कायम ठेवण्यावर तें अवलंबून आहे; आणि ती गति कायम राहील असेंच मला वाटतें.

### जादा उत्पादनावरील प्रभावी उपाय

"तुटवड्याऐवजीं भरपूर उत्पादनाची परिस्थिति साखरेच्या बाबतींत भारतांत निर्माण झाली आहे. पण दुर्दैवानें, त्या मानानें अंतर्गत खप वाढलेला नाहीं. साखरेच्या वांटपावरील नियंत्रणें बहुतेक सर्व दूर करण्यांत आलीं आहेत, पण मागील वर्षांतील शिल्लक सांठा आणि जादा उत्पादन ह्यामुळें बाजारांत साखरेचा पुरवठा मागणीपेक्षा खूपच जास्त आहे; टॅरिफ कमिशनच्या अहवालाच्या आधारें सरकारनें ठरविलेली रास्त किंमत साखरकारखान्यांच्या पदरांत पडत नाहीं. इकडे साखरेची किंमत कमी होत असतांनाच, वेज बोर्डाच्या शिफारसी अंमलांत आणण्यास साखरकारखानदारांना सांगण्यांत आलें आहे. आपल्या कंपनीनें त्या कसोशीनें अंमलांत आणल्या आहेत.

"साखरेच्या जादा उत्पादनावर उपाय म्हणजे परदेशी बाजारपेठेंत खप. सुमारें ६ लक्ष टनांची निर्गत होऊं शकली, तर सध्यांच्या उत्पादनक्षमतेवर साखरेच्या कारखान्यांचे व्यवहार समाधानकारक चालू शकतील. एक्साइज ड्यूटी कमी करून साखर स्वस्त करून, अंतर्गत खपहि वाढविण्याचे मार्ग अवलंबिले पाहिजेत. फ्रूट कॅनिंगसारख्या उद्योगांनाहि स्वस्त साखर पुरवून उत्तेजन द्यायला हवें.

"साखरकारखान्यांच्या उत्पादनावर कृत्रिम बंधनें घातल्यानें उद्योगावर प्रतिकूल परिणाम होतो, एवढेंच नव्हे तर त्यांतील प्रमुख भागीदार जो ऊस पुरविणारा शेतकरी, त्यावरहि आघात होतो. उत्पादनावर लादलेली १०% ची कपात तात्कालिकच असावी; दीर्घकालीन उपाय योजणें अधिक आवश्यक आहे. औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांतहि शेतीवर आधारित अशा सर्व उद्योगांना सरकारकडून कांहीं सबसिडी जरूर असते. आपल्या शेतीच्या परिस्थितींत आणि कार्यक्षमतेशीं मेळ नसलेल्या वेतनाचे संबंधांत भारत स्पर्धेत टिकूं शकेल इतक्या किंमतींत साखर निर्माण करूं शकेल, अशी अपेक्षा बाळगणें अव्यवहार्य ठरेल. पुरेशी साखर निर्गत करण्यासाठीं हिंदी साखरेच्या उद्योगाला सबसिडीची दीर्घकाळ गरज भासेल, असें मला वाटतें."

## डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्समधील समारंभ

### श्री. स. गो. बर्वे ह्यांचें भाषण

"आज महाराष्ट्रीय लोक उद्योगधंद्यांत व व्यापारांत मागें दिसतात. परंतु आतां त्यांनीं जास्तींत जास्त पुढें येऊन महाराष्ट्र राज्यांतील औद्योगिक वाढीच्या योजनांचा फायदा घेऊन व्यापार-उद्योगांत पडावें" असे उद्गार महाराष्ट्र इंडस्ट्रिअल बोर्डाचे चेअरमन श्री. स. गो. बर्वे यांनीं दि. ३१ रोजीं येथील डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्सच्या वार्षिक प्रमाणपत्र (डिप्लोमा व सर्टिफिकेटस) वितरण व बक्षीस समारंभ प्रसंगीं काढले. प्रारंभीं संस्थेचे अध्यक्ष श्री. द. ग. ऊर्फ अण्णासाहेब शेवेकर यांनीं स्वागतपर भाषण करून अध्यक्षांची ओळख करून दिली. नंतर प्राचार्य अ. ग. भोपटकर यांनीं संस्थेच्या कार्याचा अहवाल निवेदन केला व संस्थेच्या बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्सचे प्रमुख श्री. भाऊसाहेब क्षीरसागर यांनीं या कोर्सच्या तिसऱ्या वर्गाचा अहवाल दिला. यशस्वी विद्यार्थ्यांना अध्यक्षांच्या हस्तें डिप्लोमा, सर्टिफिकेटस व बक्षिसें वांटण्यांत आल्यानंतर अध्यक्षीय भाषण झालें. श्री. स. गो. बर्वे यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत आणखी सांगितलें, "महाराष्ट्रांत शेतीबरोबरच आतां उद्योगधंद्यांची वाढ होणें जरूर आहे. महाराष्ट्रीय व्यावसायिक जास्त कार्यक्षम व सचोटीचे दिसतात. त्यांचेजवळ तांत्रिक कौशल्याहि आहे. महाराष्ट्राच्या भावी योजनेचे दृष्टीनें या संस्थेंतून दिलें जाणारें शिक्षण महत्त्वाचें आहे. या संस्थेचा भविष्य काळ उज्वल आहे. महाराष्ट्र सरकार या संस्थेला अनुदान, वगैरे आर्थिक साहाय्य देईल अशी मला खात्री आहे."

शेवटीं हरतुरे होऊन संस्थेचे कार्यवाह श्री. शं. ह. घुपकर यांनीं आभारप्रदर्शन केल्यानंतर राष्ट्रगीत होऊन हा समारंभ संपला.

---

### स्टेट बँकेचा गोव्यांत प्रवेश

स्टेट बँक ऑफ इंडियानें पंजिम (गोवा) येथें आपली शाखा दि. २ रोजीं सुरू केली.


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००

बचतीच्या आकर्षक योजना


| | |
|---|---|
| (१) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर २॥ टक्के |
| (२) त्रैवार्षिक मासिक बचत | " ३॥ " |
| (३) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | " ५ " |

*मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधी चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

किर्लोस्कर
स्थापना १८८८

इलेक्ट्रिक पंपिंग सेट



भारतीय शेतकरी आपल्या शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठीं किर्लोस्कर पंपिंग सेटची निवड करतात. कारण ते अधिक काटकसरी, कार्यक्षम व खात्रीलायक आहेत. आपल्या कामीं योग्य आकाराच्या पंपाची निवड करून त्याचा भरपूर मोबदला मिळवा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी (द. सातारा)


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.